पुढारी पू. पान क्र.3

दि. 15/05/2023

# वसईत सामाजिक एकोप्याचे घडतेय दर्शन

## शंभर वर्षांपासून हिंदू बांधव साजरा करताहेत पीर बाबाचा उरूस

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसईमध्ये धार्मिक सलोखा आणि सामाजिक एकोप्याचे वेगळेच दर्शन बघायला मिळते आहे. वसईतील पापडी येथे शंभर वृक्ष पूर्वी पासून नवनाथांचे शिष्य असलेल्या सतकोजी पीर बाबाचा उरूस एका हिंदू बांधव साजरा करत आहेत.

वसईच्या पापडी येथील भंडार आळी येथे शंभर वर्ष पूर्वी पासून सतकोजी पीर बाबाची कबर आहे. या ठिकाणी शंभर वर्षा पासून म्हात्रे कुटुंब त्याठिकाणी त्या कबरीची रोज पूजा करून चादर चढवत आले आहेत. सतकोजी पीर हे नवनाथांचे शिष्य असल्याची आख्यायिका या ठिकाणी सांगितली जात आहे. या कबरीवर मुसलमान लोक कधीतरी येत असले तरी हिंदू मात्र त्या ठिकाणी श्रद्धेने नतमस्तक होताना दिसत आहेत. अशी माहिती सद्या याठिकाणी रोज पूजा आर्चा करणारे म्हात्रे कुटुंबातील पाचव्या पिढीतील दत्तात्रय जनार्धन म्हात्रे यांनी सांगितले. त्यांनी यावेळी माहिती देताना सांगितले कि, पूर्वी वसई मध्ये तंबूत काढले जात होते. त्यांच्या पैकी काहीजण या कबरीवर चादर चढवायला यायचे. परंतु आता मात्र कोणी येत नाही . येथील जवळपास ३०० ते ४०० हिंदू बांधव वैशाख पौर्णिमेला या पीर बाबाचा मोठा उरूस साजरा करतात. त्यावेळी पूजा करून चादर चढवली जाते . धूप अगरबत्ती लावली जाते. या दिवशी प्रसाद म्हणून बुंदी,केशरी भट, शिरा व भंडारा देण्यात येतो, असे म्हात्रे यांनी सांगितले.



(छाया : मनोज जगताप)

# घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी करणाऱ्या आरोपीस नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने ६ तासात अटक करुन गुन्हयातील चोरी केलेली संपूर्ण मालमत्ता हस्तगत केली आहे.

भाईंदर पूर्वेच्या साई सरोवर बिल्डींग, आर. एन. पी. पार्क, काशी विश्वनाथ मंदिरासमोर राहणारे धीरज त्रिभुवन परमार ( ५२ ) हे ८ मे रोजी दुपारच्या सुमारास त्यांच्या नातेवाईकांच्या घरी जोगेश्वरी मुंबई येथे व त्यांच्या पत्नी मनिषा या देखील नातेवाईकांचे लग्न असल्याने कल्याण येथे घराला कुलूप लावून गेल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रात्री परमार यांची मोलकरीण घराची साफसफाई करण्यासाठी गेली असता तिला घरातील बेडरुममधील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. या घटनेबाबत त्यांनी परमार यांना फोन करून कळविले. त्यानंतर परमार यांनी घरी येवुन पाहिले असता त्यांच्या घरातील कपाटातील रोख रक्कम २६५,००० रुपये मिळून आले नाहीत. त्यामुळे परमार यांनी नवघर पोलीस ठाण्यात ११ मे रोजी गुन्हा दाखल केला होता. हा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठांनी गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी एस. व्ही रोड, भाईंदर पूर्व, भाईंदर रेल्वे स्टेशन, मिरारोड रेल्वे स्टेशन नीलकमल नाका काशिमिरा व विटावा, ठाणे अशा वेगवेगळ्या ठिकाणी मिळून आलेल्या सी. सी. टी. व्ही. फुटेज तपासून माहिती मिळवली. आरोपी चेतन प्रकाश मोकाशी (४०) रा. बेलापुर रोड, जकात नाक्याजवळ, सूर्या नगर, मोकाशी चाळ, विटावा ठाणे यास निष्पन्न करून माजीवाडा, ठाणे येथून ११ मे रोजी रात्री ९ वा. ताब्यात घेवून त्यास गुन्हा घडल्यापासून ६ तासात अटक केली. या गुन्हयातील आरोपीकडे गुन्हयात चोरी केलेली २,६५,००० रुपये रोख रक्कम असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

लोकसत्ता पान क्र.3

# वसईत १५ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई पश्चिमेच्या भुईगाव समुद्रकिनारी १५ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाला. साहिल त्रिभुवन असे या मुलाचे नाव असून औरंगाबाद येथे राहणारा आहे. शनिवारी सायंकाळी सहाच्या सुमारास बुडाला होता. १७ तासांनंतर या मुलांच्या मृतदेहाचा शोध लागला.

साहिल वसईच्या भुईगाव किनाऱ्यावर क्रिकेट खेळण्यासाठी तो दोन मावस भावंडांसोबत गेला होता. याच दरम्यान त्यांचा चेंडू समुद्रात गेल्याने साहिलचा भाऊ जेर्मिक कजार हा तो आणण्यासाठी गेला असताना तो बुडू लागल्याने साहिल त्याला वाचविण्यासाठी समुद्रात उतरला, मात्र स्वतःच पाण्याचा अंदाज न आल्याने बुडाला होता. याची माहिती वसई पोलिसांना व पालिकेच्या अग्निशमन पथकाच्या जवानांना मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी पोहचून शोधकार्य सुरू केले होते. रात्री उशिरापर्यंत त्यांना साहिलचा शोध लागला नव्हता. रविवारी सकाळी त्याचा मृतदेह सापडला.

CS CamScanner

पुढारी पृ.पान क्र.1

दि. 15/05/2023

# उत्तनमधील शेकडो रहिवाशांना महसूल विभागाच्या नोटिसा

## घराची कागदपत्रे ३० दिवसात सादर करण्याचे आदेश, रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन येथे मोठ्या प्रमाणात महसूल विभागाची म्हणजेच सरकारी जागा आहे. या जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून तेथील आजूबाजूच्या गावातील रहिवाशांनी घरे बनवली आहेत. उत्तन येथील चौक, डोंगरी, भाटे बंदर, तसेच धावगी येथे असलेल्या सरकारी, तसेच गायरानाच्या जमिनींवर बांधण्यात आलेल्या शेकडो घरांना भाईंदरच्या अप्पर तहसीलदार कार्यालयाकडून नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. करण्यात आलेले अतिक्रमण शासनाच्या कोणत्याही धोरणानुसार संरक्षित होत असेल तर त्यासंबंधीचे तीस दिवसांत कागदपत्र सादर करा, नाहीतर करण्यात आलेली अतिक्रमणे हटवण्यात येतील, असे नोटिसांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

भाईंदर पश्चिमेला असलेल्या उत्तन या भागात मोठ्या प्रमाणात रहिवाशी वस्ती आहे. तेथे असलेल्या सरकारी तसेच गायरानाच्या जागेत रहिवाशांनी घरे बनवली आहे. तर काही जणांनी शेती करत आहेत. परंतु तहसीलदार यांच्याकडून येथील रहिवाशांना घराची कागदपत्रे सादर करण्यासाठी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. २०१० मध्ये देखील अशाच प्रकारच्या नोटिसा गावकऱ्यांना देण्यात आल्या होत्या. मात्र त्यानंतर

### नागरिकांमध्ये संभ्रम

शासनाने सरकारी जागेवरील २००० पर्यंतची अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णयही घेतला आहे. तरीही उत्तनमधील रहिवाशांना या नोटिसा दिल्यामुळे अतिक्रमण केल्याचा विषय उभा राहिला आहे. शासनाने निर्णय घेतलेला असताना उत्तन परिसरात पिढ्यानपिढ्या राहत असलेल्या रहिवाशांना नोटिसा बजावण्यात आल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या नोटिसा कशासाठी बजावण्यात आल्या आहेत ,असा प्रश्न मच्छीमारांचे नेते बर्नड डिमेलो यांनी उपस्थित केला आहे.

### अन्यथा जमिनीचा ताबा महसूल विभागाकडे द्यावा

या नोटीसीमध्ये शासकीय जमीन व गायरान जमिनीवर झालेले अतिक्रमण शासनाच्या कोणत्याही धोरणानुसार अथवा तरतुदीनुसार संरक्षित होत असेल तर त्यासंबंधीची कागदपत्रे अप्पर तहसीलदार कार्यालयात नोटीस मिळाल्यापासून तीस दिवसांत सादर करावीत. ही कागदपत्रे दिलेल्या कालावधीत सादर न केल्यास झालेले अतिक्रमण नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसांत काढून टाकावे व जमिनीचा ताबा महसूल विभागाकडे द्यावा. तसे न केल्यास हे अतिक्रमण शासकीय खर्चाने हटवण्यात येईल व त्याचा सर्व खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. महसूल विभागाकडून या नोटिसा पाठवल्यामुळे वर्षानुवर्षे त्या जागेत राहणाऱ्या रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गायरानच्या जमिनींवरील अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

१६/०२/२०१८ अन्वये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभ मिळण्यास पात्र ठरत असलेल्या लाभार्थीची शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच २२/०८/२०२२ अन्वये सर्वांसाठी घरे या योजनेअंतर्गत बेघर व्यक्तींनी निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमीन तसेच गायरान जमिनीवरील केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा व बेघर भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या सुमोटो जनहित याचिकेत न्यायालयाने ०६/१०/२०२२ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्यामधील गायरान जमिनींवरील केलली अतिक्रमणे ही कोणत्याही परिस्थितीत या वर्षा अखेर निष्कासित करण्याचे निर्देश दिलेले आहे. या नोटिसा पाठवल्यामुळे वर्षानुवर्षे त्या जागेत राहणाऱ्या रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ट्रक चोरी करणाऱ्या दोघांना अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दोघांना गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांनी अटक करून साडे पाच लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. नालासोपारा पूर्वेच्या ओम साई पार्कींग, श्रीरामनगर येथे लक्ष्मण धिरु चौहान यांनी त्यांचा ५ लाख रुपये किमतीचा ट्रक ८ मे २०२३ रोजी पार्क करून ठेवला होता. त्यावेळी कोणीतरी अज्ञात चोरट्याने तो ट्रक चोरी करून नेला त्याबाबत पेल्हार पोलस ठाण्यात भा.द.वि. ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांनी तपास करून आरोपी फहीम अब्बास भुरे, दिनेश अनंता भोईर यांनी आपसात संगणमत करून हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना १३ मे रोजी अटक करण्यात आली आहे. त्यांनी चोरलेला ट्रक व गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटारसायकल असा साडे पाच लाखाचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. त्यांनी इतर दोन पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. आरोपी यांना पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

पुण्यनगरी पृ. पान क्र.1

# मीरा-भाईंदरमध्ये काँग्रेसकडून कर्नाटक विजयाचा जल्लोष



**मीरा रोड :** कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला घवघवीत यश मिळाल्याबद्दल मीरा-भाईंदर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने माजी आमदार मुझफ्फर हुसेन यांच्या प्रमुख उपस्थितीत मीरा रोड,. शांती नगर येथील हार्मोनी कार्यालयाबाहेर विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला.

माजी आमदार मुझफ्फर हुसेन यांना केंद्रीय नेतृत्वाने रायचूर जिल्ह्यातील सिंद्धनोर विधानसभा मतदारसंघासाठी राष्ट्रीय निरीक्षक म्हणून जबाबदारी दिली होती. हुसेन त्या मतदारसंघात १० दिवस तळ ठोकून होते. त्यांनी प्रचाराची धुरा सांभाळत त्या मतदारसंघात सभा घेतल्या, राजकीय रणनीती यशस्वीपणे राबवल्याने त्या मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार हांपनगौडा मताधिक्याने विजयी झाले. जनतेला विकास हवा आहे. जाती धर्माच्या नावाने राजकारण करून देशातील प्रश्न सुटणार नाहीत, याचा प्रत्यय कर्नाटकातील सुज्ञ जनतेला आल्याने त्यांनी मतदान पेटीद्वारे आपला निकाल दिला, असे मुझफ्फर हुसेन म्हणाले. या वेळी कार्यकर्त्यांनी हुसेन यांचाही सत्कार करत फटाके फोडत, घोषणा देत विजयी जल्लोष साजरा केला. कार्यक्रमात पक्षाचे नगरसेवक, पदाधिकारी यांच्यासह सर्वसामान्य नागरिक सहभागी झाले होते.

CamScanner

सकाळ पान क्र.5

दि. 15/05/2023

# नालासोपाऱ्यात तिघे गुन्हेगार अटकेत

## १२ गुन्ह्यांची कबुली; १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

नालासोपारा, ता. १४ (बातमीदार) : घरफोड्या, वाहनचोरी, जबरी चोरी करणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात विरारच्या गुन्हे शाखा कक्ष ३ चे प्रभारी पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या पथकाला यश आले आहे. चोरट्यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयासह मुंबई, ठाणे परिसरातील १२ गुन्ह्यांची कबुली दिली आहे. त्यांच्याकडून वेगवेगळ्या गुन्ह्यातील १५ लाखांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

दीपकसिंग ऊर्फ भुसिसिंग राजूसिंग टाक (वय ३९), फहिब अब्बास भुरे, दिनेश अनंता भोईर असे अटक केलेल्या आरोपींची नाव आहेत. हे तिघेही भिवंडीच्या विविध भागांतील राहणारे आहेत. दीपकसिंग हा सराईत गुन्हेगार असून नालासोपारा, विरार, तुळिंज, रबाले, डोंबिवली, कळवा पोलिस ठाण्यातील १० गुन्ह्यांची त्याने कबुली दिली आहे. तसेच गुजरात, नवी मुंबई, ठाणे शहर, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील पोलिस ठाण्यात खून, दरोडा, घरफोडी, चोरी, मोटरवाहन चोरीसारखे गुन्हे दाखल आहेत; तर इतर दोघांवर दोन गुन्हे दाखल असून त्यांच्याकडून पाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

२०२२ पासून अशा गुन्ह्याच्या घटना वाढत होत्या. त्या अनुषंगाने विरार गुन्हे कक्ष शाखा ३ चे प्रभारी पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या नेतृत्वाखाली पोलिस उपनिरीक्षक शिवाजी खाडे, उमेश भागवत, पोलिस हवालदार अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, मनोज सकपाळ, सागर बावरकर, अश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव या पथकाने कौशल्याने या गुन्ह्याचा तपास करून तिन्ही आरोपींना अटक केले आहे.

सकाळ पू. पान क्र.1

# वसई-विरार महापालिकेची तीन नवीन अग्निशमन केंद्रे

## वाढत्या नागरीकरणामुळे निर्णय

विरार, ता. १४ (बातमीदार) : वसई, विरार परिसरात वाढती बांधकामे आणि लोकसंख्या पाहून नव्याने अग्निशमन विभागाची तीन केंद्रे उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. शहरात सध्या सहा अग्निशमन केंद्रे कार्यरत असून तीन नवीन केंद्रांमुळे ही एकूण संख्या नऊ वर पोहोचणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.


वसई विरार महापालिका परिसरात गेल्या काही वर्षांत नागरीकरण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. त्याबरोबरच वसई पूर्व, सातिवली, भोयदापडा, वालिव, पेल्हार, विरार हा औद्योगिक परिसर आहे. या ठिकाणी आग लागल्यास अग्निशमनच्या गाड्या तातडीने पोहोचून आग तत्काळ नियंत्रणात आणाव्यात, या दृष्टीने पालिकेचे नियोजन सुरू आहे. महापालिकेचे क्षेत्र विस्ताराने मोठे असून नऊ प्रभाग समित्या आहेत. सध्या पालिका क्षेत्रात सहा अग्निशमन केंद्रे आहेत. यात आचोळे, वसई सन सिटी, नालासोपारा पश्चिम, म्हाडा विरार, विरार तरणतलाव आणि वसई गाव यांचा समावेश आहे.

महापालिका क्षेत्राच्या पूर्व पट्टीत एकही अग्निशमन केंद्र नव्हते. ही बाब लक्षात घेऊन पालिकेने आता वालिव, पेल्हार आणि वसई गाव या ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्रे उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाने मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अपघात झाल्यास त्याठिकाणी अग्निशमनची वाहने पोहोचू शकतील. पूर्वपट्टीत असलेल्या औद्योगिक परिसरालाही त्याचा फायदा होणार आहे.

सामना पान क्र.7

# वसईत टीव्ही मालिकेचा सेट जळून खाक

वसई, दि. १४ (सा.वा.) - वसईत 'अलिबाबा : दास्तान-ए-काबूल' या टीव्ही मालिकांचा सेट जळून खाक झाला. पाच महिन्यांपूर्वी वसईतील याच सेटवर तुनिषा शर्मा या टीव्ही अभिनेत्री हिने गळफास घेऊन आत्महत्या केली होता. त्यानंतर हा सेट शूटिंगसाठी बंद करण्यात आला होता. आता याच मालिकेच्या सेटला मोठी आग लागली. आगीत हा सेट पूर्णपणे जळाला.



नायगाव पूर्व येथे भजनलाल स्टुडिओ आहे. याच ठिकाणी 'अलिबाबा : दास्तान ए काबूल' या मालिकेचा सेट आहे. शनिवारी रात्री उशिरा या सेटला अचानक आग लागली. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. स्टुडिओच्या सेटला आग कशी लागली, याचे कारण अद्याप समोर आलेले नाही. सध्या याचा तपास सुरू आहे. मात्र या आगीमुळे संपूर्ण सेटचे नुकसान झाले आहे. या आगीत संपूर्ण सेट जळून खाक झाला आहे. स्टुडिओमधील याच सेटवर अभिनेत्री तुनिषा शर्माने २४ डिसेंबर २०२२ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती.

# भाईंदरमध्ये घर भस्मसात

भाईंदर, दि. १४ (सा.वा.) - शॉर्टसर्किटमुळे आगीचा भडका उडाल्याने भाईंदरमध्ये घर जळाल्याची घटना घडली आहे. ही आग इतकी भीषण होती की, काही क्षणातच संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी गेले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

भाईंदरच्या आयडियल पार्क परिसरातील श्री साई चरण इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर प्रमोद दुबे यांच्या मालकीचे घर आहे. रविवारी दुपारी सवातीनच्या सुमारास बंद घराला अचानक आग लागली. याची माहिती मिळताच अग्निशमदलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. अर्धा तासानंतर आग आटोक्यात आली. मात्र घरातील धान्य, कपडे, भांडी संपूर्ण वायरिंग आणि इलेक्ट्रिक सामान तसेच इतर वस्तू जळून खाक झाल्या. आपले घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याचे बघून दुबे यांच्या पायाखालची जमीनच सरकली. या आगीत संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाला.

आ

CamScanner

लोकमत पान क्र.8

दि. 15/05/2023

# मोबाइल हरवला तरी नो टेन्शन

## हरवलेले मोबाइल ब्लॉक, ट्रेस करण्याचे तंत्रज्ञान केंद्र सरकार आणणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मोबाइल हरवला अथवा चोरीला गेल्यास आपण बेचैन होते. अनेकदा पोलिसांत तक्रार करूनही मोबाइल मिळत नाही. मात्र, आता मोबाइल हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास चिंता करण्याची गरज नाही. सरकार या आठवड्यात हरवलेले किंवा चोरीला गेलेले मोबाइल फोन 'ब्लॉक' किंवा ट्रेस करण्यासाठी ट्रॅकिंग सिस्टम सुरू करणार आहे. एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने ही माहिती दिली.

१७ मे रोजी जागतिक दूरसंचार दिनानिमित्त सरकार मोबाइल ब्लॉकिंग आणि ट्रॅकिंग सिस्टम सुरू करणार आहे. केंद्रीय दूरसंचारमंत्री अश्विनी वैष्णव अधिकृतपणे संचार साथी पोर्टल (सीईआयआर) लाँच करणार आहेत. याद्वारे लोक चोरीला गेलेले किंवा हरवलेले फोन ब्लॉक आणि ट्रॅक करू शकतील.

सेंटर फॉर डिपार्टमेंट ऑफ टेलिमॅटिक्स (सी-डॉट) सध्या दिल्ली, महाराष्ट्र, कर्नाटक आणि ईशान्य प्रदेशातील काही दूरसंचार कार्यालयांमध्ये या प्रणालीचा एक पायलट प्रकल्प चालवत आहे, जो आता संपूर्ण भारतात लागू करण्यात येणार आहे.



### नेमका कुणाला फायदा?

सीडॉटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष राजकुमार उपाध्याय यांनी सांगितले की, मोबाइल ब्लॉकिंग आणि ट्रॅकिंग सिस्टम भारतभर सुरू करण्यासाठी सज्ज करण्यात आली आहे. या तिमाहीत ती संपूर्ण भारतात आणली जाईल. ही प्रणाली लोकांना त्यांचे हरवलेले किंवा चोरीला गेलेले मोबाइल ब्लॉक आणि ट्रॅक करण्यास सक्षम करेल.

### तस्करीला आळा

त्यांनी सांगितले की, 'सिस्टममध्ये एक अंगभूत यंत्रणा आहे जी मोबाइलच्या तस्करीलाही आळा घालेल.' मात्र, ते कधी सुरू होणार, याची निश्चित तारीख त्यांनी दिलेली नाही.

### कसा शोधणार फोन?

दूरसंचार ऑपरेटर आणि सीईआयआर सिस्टमला डिव्हाइसचा आयएमईआय नंबर आणि त्याच्याशी संबंधित मोबाइल नंबरची माहिती असेल. काही राज्यांमध्ये याचा उपयोग हरवलेले किंवा चोरीला गेलेले मोबाइल फोन शोधण्यासाठी ही माहिती वापरली जाईल.

**४,७०० लाख**
हरवलेले किंवा चोरीला गेलेले मोबाइल या पोर्टलद्वारे ब्लॉक करण्यात आले आहेत.

**२.४० लाख +**
मोबाइल ट्रॅक करण्यात आले आहेत.

**८,०००**
फोनही या पोर्टलद्वारे जप्त करण्यात आले आहेत.

**२,५००+**
हरवलेले मोबाइल परत मिळवून मालकाच्या ताब्यात देण्यास कर्नाटक पोलिसांना या पोर्टलची मदत झाली.

### आयएमईआय नंबर बदलला तरीही...

- दूरसंचार नेटवर्कवर क्लोन केलेल्या मोबाइल फोनचा वापर शोधण्यासाठी सीडॉटने नवीन वैशिष्ट्ये जोडली आहेत.
- सध्या, गुन्हेगार मोबाइल चोरल्यानंतर मोबाइलचा आयएमईआय क्रमांक बदलतात, त्यामुळे मोबाइल ट्रॅक किंवा ब्लॉक करता येत नाही.
- राजकुमार उपाध्याय यांनी सांगितले की, हे पोर्टल आयएमईआय नंबर बदलल्यानंतरही डिव्हाइस ट्रॅक व ब्लॉक करण्यास सक्षम असेल.

### काय बंधनकारक?

- सरकारने भारतात मोबाइल उपकरणांची विक्री करण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय मोबाइल उपकरण ओळख (आयएमईआय -१५ अंकी क्रमांक) उघड करणे बंधनकारक केले आहे.
- मोबाइल नेटवर्कमध्ये त्यांच्या नेटवर्कमध्ये अनधिकृत मोबाइल फोन प्रवेश शोधण्यासाठी मंजूर आयएमईआय क्रमांकांची सूची असेल.

---

लोकमत पु. पान क्र.1



# मीरा-भाईंदरमध्ये बेपत्ता महिलांचे प्रमाण जास्त

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा भाईंदरमध्ये अल्पवयीन मुलींच्या अपहरणापेक्षा तरुणी व महिलांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण जास्त आहे. गेल्या वर्षी जानेवारी ते एप्रिल २०२२ या चार महिन्यात ३५ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या होत्या. त्यापैकी ८ गुन्हे प्रलंबित होते. आयुक्तालयाच्या हद्दीत सुमारे ४१८ महिला बेपत्ता झाल्या होत्या. त्यापैकी १६० जणी सापडल्या नव्हत्या. केवळ ४ महिन्यांची आकडेवारी पाहिली तर अल्पवयीन मुली आणि तरुणी - महिलांच्या एकूण बेपत्ता होण्याचे प्रमाण चिंताजनक आहे.

२०२२ वर्षाची तसेच चालू २०२३ वर्षाची आकडेवारी पोलिसांनी अजून दिली नसली तरी शहरात जानेवारी ते मार्च २०२३ काळात महिला - पुरुष मिळून पळवून नेल्याचे ३९ गुन्हे दाखल असून त्यातील ३८ गुन्हे उघड झाले आहेत. लव्ह जिहादसारख्या घटना घडल्याचे पोलिसांकडून मान्य केले जात नसल्याने तशी नोंद पोलिसांकडे नसल्याचे सांगण्यात येते. गेल्या एप्रिल महिन्यातच भाईंदरमधील तरुणीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करून तिचा निकाह लावण्याचा प्रयत्न केला गेल्याचे पोलिसांच्या कार्यवाहीत समोर आले होते. पोलिसांनी आरोपी तरुणांसह त्याची आई आणि त्याच्या मित्राला अटकदेखील केली होती. दरम्यान, पोलिस यंत्रणा या वाढत्या प्रकारांबाबत अधिक सतर्क झाल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

---

म.टा.पु.पान क्र.1

### दलाल अटकेत

**मिरा-भाईंदर :** वेश्याव्यवसायासाठी अल्पवयीन मुली पुरवणाऱ्या एका महिला दलालाला मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने अटक केली आहे. उल्हासनगर येथील रितू नामक दलाल महिला व्हॉट्सॲपवर फोटो पाठवून अल्पवयीन मुली पुरवत असल्याची माहिती मिळाली होती. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील एका हॉटेलजवळ पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. यावेळी कविता उर्फ रितू सिंग ही दलाल महिला पंधरा वर्षीय मुलीला वेश्याव्यवसायासाठी पाठवण्यासाठी रक्कम ठरवून ती बोगस ग्राहकाकडून स्वीकारताना आढळली. पोलिसांनी दलाल महिलेला अटक करत तिच्यावर काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. एका अल्पवयीन मुलीसह अन्य एका पिडित तरुणीची सुटका करण्यात आली आहे.

CamScanner

म.टा.पु. पान क्र.।

दि.15/05/2023

# बेकायदा पंपांवर बडगा

## अतिरिक्त पाणी खेचणारे ५० विद्युत पंप जप्त; मिरा-भाईंदरमध्ये कारवाई तीव्र

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

महापालिकेकडून देण्यात आलेल्या थेट नळ जोडणीला पाणी उपसा पंप बसवणाऱ्या सोसायट्यांवर मिरा-भाईंदर महापालिकेने नुकताच कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईत ५० हून अधिक पंप जप्त करत करण्यात आले असून पुढील टप्प्यात कारवाई अधिक तीव्र केली जाणार आहे. काही सोसायट्यांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आल्याने, पालिका प्रशासनामार्फत ही कारवाई करण्यात आली आहे.

मिरा-भाईंदर शहराची मागील काही वर्षांत वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता, शहराला दररोज २१६ एमएलडी पाण्याची गरज आहे. परंतु, पालिकेला स्टेम व एमआयडीसी यांच्याकडून केवळ १९० एमएलडी इतकाच पाणीपुरवठा केला जात आहे. आधीच अपुरे पाणी असताना, त्यातही कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात असल्याने रहिवाशांना पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागत आहेत. दुसरीकडे काही सोसायट्यांकडून अतिरिक्त पाणी खेचण्याच्या उद्देशाने नळ जोडणीला थेट विद्युत पाणी उपसा पंप बसवण्यात आले आहेत. परिणामी, उर्वरित सोसायट्यांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होत नव्हते.

यासंबंधीच्या अनेक तक्रारी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे आल्या होत्या. त्यावर तात्काळ कारवाईसाठी मोहीम राबवण्याच्या सूचना आयुक्तांनी पाणीपुरवठा विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार मागील काही दिवस मोहीम राबवल्यानंतर, ५० हून अधिक सोसायट्यांनी बेकायदा पाणी उपसा पंप बसवल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हे पंप जप्त करत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

### ... तर नळजोडणी खंडित करणार

यापुढे बेकायदा पाणी उपसा पंप बसवल्यास नळ जोडणीच खंडित करण्याची भूमिका पालिकेने घेतली आहे. यासह ५० हजार रुपये दंडदेखील आकारला जाणार आहे.



### पंप हा नाईलाज

पालिका प्रशासनाने विद्युत पंप बसवणाऱ्या काही सोसायट्यांवर कारवाई केली असली, तरी प्रत्यक्षात विद्युत पंप वापरणाऱ्या सोसायट्यांची संख्या कित्येक पटीने अधिक असल्याचे बोलले जाते. काही भागात खुलेआम विद्युत पंपांचा वापर केला जातो. पालिकेकडून कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात असल्याने ही परिस्थिती नेहमीच उद्भवल्याचे मत नागरिकांचे आहे. पंप बसवले नाहीत, तर पाणी मिळणारच नाही, त्यामुळे नाईलाजास्तव हजारो रुपये खर्च करून पंप खरेदी करावे लागत असून त्यासाठीचे वाढीव विद्युत देयक भरावे लागत असल्याचे काहींनी सांगितले. त्यामुळे पालिकेने अधिक दाबाने पाणीपुरवठा करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याची मागणी आता पुढे येत आहे.

# चुळणा गावाला पुराचा धोका कायम

**म. टा. वृत्तसेवा , वसई**

वसईतील चुळणे गावात मागील अनेक वर्षांपासून पावसाळ्यात पुराची समस्या भेडसावत आहे. महापालिकेच्या स्थापनेला ११ वर्षे उलटूनही दरवर्षीच्या पुराच्या समस्येवर योग्य उपाययोजना न केल्याने, यंदाही पुराचे भय कायम असल्याने येथील रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. पुराची ही समस्या कायमस्वरूपी सोडवण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

चुळणे गाव हे १९९४ पासून तत्कालीन नवघर माणिकपूर नगरपरिषदेचा भाग आहे, तर २००९मध्ये वसई-विरार महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून हे गाव महापालिकेचा भाग आहे. मात्र तरीही या गावात दरवर्षी साचणारे पाणी ही सर्वात मोठी समस्या आहे. चुळणे येथे लोकवस्ती मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने या भागात मातीभराव होत आहे. यामुळे पाण्याचा निचरा होण्याचे नैसर्गिक मार्ग बंद झाले आहेत. यासह खाडीला जोडणाऱ्या ओहळची गेल्या अनेक वर्षांत साफसफाई झालेली नाही. चुळणे गास रस्त्यावरील उघाड्यादेखील अस्वच्छ आहेत. येथील पाणी निचऱ्याचे मार्ग बंद झाल्याने पावसाळ्यात पुराची समस्या उद्भवते. दरवर्षी या गावातील घरे पाण्याखाली जाऊन अनेक घरांत पाणी शिरते. त्यामुळे रहिवासी संतप्त आहेत.

येथे कायमस्वरूपी उपाययोजना करून नागरिकांचे पुरापासून संरक्षण करावे, अशी मागणी चुळणा येथील माजी सरपंच तथा जागृती सेवा संस्था शिष्टमंडळाचे सल्लागार जॅक गोम्स यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

### तज्ज्ञांच्या शिफारशींकडे काणाडोळा?

पालिकेने शहरात नालेसफाई सुरू केली आहे. मात्र नालेसफाई करताना, आयआयटी आणि नीरी या तज्ज्ञ संस्थांच्या समितीने पूर नियंत्रणासाठी दिलेल्या अहवालात सुचवलेल्या उपाययोजना धुडकावण्यात आल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. नालेसफाईची रोज पाहणी करून त्याचा अहवाल पालिका अधिकाऱ्यांनी तपासणे गरजेचे आहे, याकडेही स्थानिकांनी लक्ष वेधले आहे.

CamScanner

दि. 15/05/2023

म.टा. पान क्र.1

# अकोल्याला दंगलीची झळ



म. टा. वृत्तसेवा, अकोला

## सोशल मीडियावरील संदेशावरून हिंसा; एकाचा मृत्यू

- शनिवारी मध्यरात्रीनंतर शहरात जाळपोळ
- घरे पेटवली, वाहनांचे नुकसान; २० जणांना अटक
- शहरात संचारबंदी; इंटरनेट सेवाही बंद

सोशल मीडियावर व्हायरल मेसेजमुळे अकोल्यातील जुन्या शहरात शनिवारी रात्री पावणेबारा वाजताच्या सुमारास दंगल उसळली. दोन समुदायांनी रस्त्यावर उतरून दगडफेक, वाहनांची तोडफोड, जाळपोळ करीत तणाव निर्माण केला. या वैरभावनेतूनच एकाचा मृत्यू झाला, तर नऊ जण गंभीर जखमी झाले. या प्रकरणी ३० जणांना अटक करण्यात आली असून, संवेदनशील भागांत संचारबंदी लागू करण्यात आली आहे व इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे.

सोशल मीडियावरील एका संदेशावरून हा प्रकार भडकला. एका समुदायाचे सुमारे दीडशेहून अधिक लोक या संदेशाविषयी तक्रार करण्यासाठी रामदासपेठ पोलिस ठाण्यात पोहोचले. तक्रार दाखल करून हे सर्व जुन्या शहराकडे गेले व त्यानंतर हिंसा भडकली. रस्त्यावरील दुचाकी, चारचाकी व ऑटोरिक्षांना लक्ष्य करण्यात आले. जाळपोळ आणि दगडफेक सुरू झाली. दगड आणि विटांचा मारा सुरू झाला. अखेर (पान ८वर)

(पान एकवरून)

## अकोल्याला दंगलीची झळ

पोलिसांनी लाठीमार व अश्रुधुरांचा मारा करीत जमाव पांगवला. तोच, दुसरा समुदाय रस्त्यावर उतरला. तोही हिंसक झाला. जुने शहर परिसरात दंगलीचे चटके जाणवले. दंगल नियंत्रणात आणण्यासाठी अमरावती येथून आरपीएफच्या तुकड्या बोलविण्यात आल्या. या दंगलीत विलास गायकवाड यांचा हकनाक बळी गेला. ते कामावरून परत येत असताना दंगलीच्या तडाख्यात सापडले. दगडफेकीत गंभीर जखमी झाले व उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. रविवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

जुने शहर व परिसरात घडलेल्या दंगलीचे पडसाद संपूर्ण शहरासह जिल्ह्यात उमटले. अकोल्यातील जुने शहर पोलिस ठाणे, डाबकी रोड पोलिस ठाणे, रामदासपेठ पोलिस ठाणे व सिटी कोतवाली ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

**दंगेखोरांची धरपकड**

पोलिसांनी रात्री उशिरा दंगलीसाठी जबाबदार दोषींच्या घरांची झाडाझडती सुरू केली. वादग्रस्त पोस्ट व्हायरल करणाऱ्यासह इतर ३० जणांना दंगल घडवून आणण्याच्या आरोपाखाली पोलिसांनी अटक केली आहे. दंगलीच्या सूत्रधाराचा शोध घेऊन त्याला अटक करू, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांनी 'मटा'शी बोलताना दिली.

CamScanner

लोकमत

# ११२ वर फेक कॉल केला; तर कारावास अन् दंडही भरला

## नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी हेल्पलाइन क्रमांक केला सुरू

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी, कुठलीही घटना घडल्यास पोलिस तत्काळ घटनास्थळी पोहोचावेत, यासाठी ११२ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू केला आहे. या क्रमांकावरून कॉल येताच विशेष यंत्रणेच्या मदतीने व वाहनांवरील जीपीएसच्या साहाय्याने कॉल नेमका कोठून आला, याचे लोकेशन कळण्याची व्यवस्था उभी केली जात आहे. त्यामुळे पोलिस घटनास्थळी उशिरा पोहोचणे, आरोपी फरार होणे यासह इतरही बाबींना आळा बसणार आहे. बऱ्याचदा पोलिसांच्या ११२ क्रमांकावर खोटी माहिती देणारे, फसवणूक करणारे दूरध्वनी येतात. आता मदतीच्या उद्देशाने सुरू असलेल्या या यंत्रणेला फेक कॉल करून त्रास देणाऱ्यांवरही कारवाई करण्यात येत आहे.




### ११२ डायल करा, मदत मिळवा

११२ या हेल्पलाइनवरून सर्व प्रकारची मदत मिळणार आहे. हा नंबर डायल केल्यानंतर दहाव्या मिनिटाला पोलिस घटनास्थळी येतील, असे नियोजन आहे. मदत हवी असेल अथवा काही गैरप्रकार होत असेल तर मदत घेता येते.

### फेक कॉल करणाऱ्यांना दंड

शासनाकडून मदतीसाठी चांगली यंत्रणा केली असतानाही, त्याची मजा घेणारेही काही जण असतात. फेक कॉल करून यंत्रणेला वेठीस धरणाऱ्यांवर कारवाई करण्यात येते.

### २४ तास मदतीसाठी तयार

- 'डायल ११२' हा उपक्रम पूर्ण २४ तास कार्यरत असतो. आयुक्तालयात रात्रीच्या वेळेसच अधिक कॉल येत असल्याचा अनुभव आहे.
- पोलिसांकडे मदतीसाठी दिवसाला ७० पेक्षा जास्त कॉल येतात. ही मदत घरगुती भांडण, अपघात, मारामारी, दारू पिऊन रस्त्यावर धिंगाणा यासाठी येत असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.



### सर्वाधिक कॉल महिलांचे

दररोज येणाऱ्या कॉलमध्ये महिलांच्या तक्रारीचे प्रमाण जास्त आहे. पती मारहाण करतो, शेजारचे भांडण करत आहेत, छेडछाड केली जात आहे. कोणी पाठलाग करते. कामाच्या ठिकाणी त्रास दिला जात आहे अशा तक्रारी महिलांच्या सांगितल्या जातात.

### ३० कर्मचाऱ्यांचा ताफा

सदर नियंत्रण कक्षात ६ अधिकारी, २४ कर्मचारी २४ तास ऑन ड्यूटी पोलिस आयुक्तालयाच्या कार्यालयात असलेल्या नियंत्रण कक्षात कार्यरत असतात.

### ज्येष्ठांसाठी ठरतेय मदत

एकट्याच राहणाऱ्या वयोवृद्धांना कोणतीही अडचण आल्यास त्यावर मदत मागितली जाते. पोलिसांकडून या कॉलवर प्रत्यक्ष घटनास्थळी जात मदत केली जात आहे.

### ... तर कारवाई करणार

शहरातील व ग्रामीण नागरिकांना ११२ या क्रमांकावर डायल करून मदत मागता येईल. पोलिस कंट्रोल रूमला फेक कॉल करून त्रस्त केले तर कारवाई करणार. - पोलिस प्रशासन



CamScanner

लोकमत



ज्वेलर्स दुकानाचे शटर उचकटून चोरी करणारे तसेच कार, ट्रक चोरी करणाऱ्या तीन आरोपींना अटक करण्यात गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांना यश आले.

Hello Vasai
Page No. 2 May 15, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

लोकमत

# ज्वेलर्सचे शटर उचकटून चोरी करणाऱ्यास अटक

## गुन्हे शाखेच्या युनिट तीनला यश

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : ज्वेलर्स दुकानाचे शटर उचकटून चोरी करणारे तसेच कार व ट्रक चोरी करणाऱ्या तीन सराईत आरोपींना अटक करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांना यश मिळाले आहे. तिन्ही आरोपींकडून पोलिसांनी १२ गुन्ह्यांची उकल करून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी रविवारी दिली आहे.

पोलिस आयुक्तालयात गेल्या काही महिन्यांपासून घरफोडी व चारचाकी वाहने चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दखल घेऊन या गुन्ह्यांना पायबंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. नालासोपाऱ्यातील एसटी डेपो रोडवर गोविंदसिंग राजपुरोहित (३९) यांचे कावेरी नावाचे ज्वेलर्सचे दुकान आहे. ११ नोव्हेंबरला मध्यरात्री बंद ज्वेलर्स दुकानाचे लोखंडी ग्रील आणि शटरचे कुलूप तोडून सेंटर लॉकही तोडण्याचा प्रयत्न झाला होता. चोरट्यांनी दुकानाच्या बाहेरील सीसीटीव्ह कॅमेरा चोरी करून नेला होत नालासोपारा पोलिसांनी गुन्हा दाखर केला होता. या गुन्ह्याचा तपा करताना गुन्हे शाखेच्या युनि तीनच्या पोलिसांनी आरोप दीपकसिंग उर्फ बुशिसिंग टाक (३९ याला ताब्यात घेऊन अटक केर्ल त्याच्याकडून १० लाखांच्या तीन का जप्त केल्या.

### आरोपीकडून केली १० गुन्ह्यांची उकल

आरोपीकडून घरफोडी, चोरी, चारचाकी वाहन चोरी असे १० गुन्ह्यांची उकल केली आहे. हा आरोपी सराईत असून त्याच्याविरुद्ध मकोका, खून, दरोडा, घरफोडी, चोरी, विशेषत: ज्वेलर्स दुकाने चोरी, वाहन चोरी असे १० पेक्षा जास्त गुन्हे गुजरात, नवी मुंबई, ठाणे शहर, मीरा भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालयाअंतर्गत विविध पोलिस ठाण्यात दाखल आहेत.



CamScanner

# चेन्नईत मित्राचा खून, नालासोपाऱ्यात अडकला

## फरार आरोपीला ५ वर्षानंतर अटक



चेन्नईत मित्राचा खून करून पळून गेलेल्या भूमिगत आरोपीला वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने तामिळनाडू पोलिसांच्या मदतीने अटक केली.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** चेन्नईत मित्राचा खून करून पळून गेलेल्या भूमिगत आरोपीला ५ वर्षानंतर वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने तामिळनाडू पोलिसांच्या मदतीने अटक केली आहे.

चेन्नईस्थित तम्बरम शहरातील टी-११ केलमबक्कम पोलिस ठाण्यातील हत्येच्या दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी रघू दूघई मंडल याचा तामिळनाडू पोलिस मागील ५ वर्षांपासून सातत्याने शोध घेत होते. वालीव पोलिसांनी बातमीदाराने दिलेल्या माहितीच्या आधारे आरोपी रघू मंडल हा वसईतील कंपनीमध्ये काम करीत असल्याची माहिती मिळवली त्याला ताब्यात घेतले.

ही कामगिरी उपायुक्त पोर्णिमा चौगुले -श्रींगी, सहायक आयुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वालीवचे वरिष्ठ निरीक्षक कैलास बर्वे, निरीक्षक (गुन्हे) राहुलकुमार पाटील तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोलिस हवालदार मुकेश पवार, मनोज मोरे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, अभिजित गढरी यांनी पार पाडली आहे.

### नेमकी घटना काय?

आरोपी रघू मंडल व त्याचा मित्र अनिल चौधरी हे दोघे चेन्नईतील कंपनीत एकत्र काम कामाला होते. तसेच एकाच रूममध्ये राहात होते. कालांतराने दोघांमध्ये किरकोळ कारणांवरून भांडण झाले. त्याचा राग धरून १४ सप्टेंबर २०१८ रोजी रात्री रघू मंडलने अनिलचा धारदार चाकूने गळा कापून खून केला होता. तामिळनाडू पोलिसांनी खुनाच्या गुन्ह्याच्या तपासात आरोपीने केलेल्या गुन्ह्याचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले होते.

Mumbai Main
Page No. 8 May 14, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

लोकमत

# ट्रक चोरणाऱ्या दुकलीला भिवंडीतून घेतले ताब्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** ८ मे रोजी लक्ष्मण चौहान यांचा श्रीराम नगर येथील पार्किंगमधून ५ लाख रुपयांचा ट्रक चोरून नेला होता. पेल्हार पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास करताना गुन्हे शाखेच्या युनिट तीनने आरोपी फहिम अब्बास भुरे आणि दिनेश अनंता भोईर या दोघांना शनिवारी भिवंडी येथून ताब्यात घेतले.

आरोपीकडून ट्रक आणि वापरलेली दुचाकी हस्तगत केली असून दोन गुन्ह्यांची उकल केली. ज्वेलर्समध्ये चोरी करणाऱ्याला अटकेसह ट्रकचोरांना अटकेची कामगिरी पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक पो. आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.निरीक्षक प्रमोद बडाख, पो.उपनिरीक्षक उमेश भागवत, शिवाजी खाडे, हवालदार अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव, प्रवीण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव, संतोष चव्हाण यांनी केली.

Hello Vasai
Page No. 2 May 15, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

सकाळ

# भक्तांचे दागिने चोरणारे अटकेत

## ब्रागेश्वर धाम सरकार यांच्या कार्यक्रमातील चोरीचा छडा

भाईंदर, ता. १४ (बातमीदार) मिरा रोड येथे धीरेंद्र शास्त्री र्फ बागेश्वरधाम सरकार यांच्या ार्यक्रमात भक्तांचे लाखो रुपयांचे ागिने चोरीला गेल्याची घटना मार्च हिन्यात घडली होती. या प्रकरणी ारा-भाईंदर वसई-विरार पोलिसांच्या ाथक प्रयत्नाने आठ संशयित ारोपींना अटक करण्यात यश आले ाहे. त्यांच्याकडून सुमारे पन्नास ाख रुपयांचे दागिने हस्तगत केले. दागिने पोलिस आयुक्त मधुकर ांडे हस्ते संबंधितांना परत केल्याचे ालिसांकडून सांगण्यात आले.

१८ व १९ मार्चदरम्यान मिरा ड येथील एस. के. स्टोन पोलिस ौकीच्या मागे असलेल्या मोकळ्या दानात बागेश्वरधाम सरकार यांच्या वचनाचा कार्यक्रम आयोजित रण्यात आला होता. या कार्यक्रमाला ाखो भक्त आल्याने मोठी गर्दी सळली होती. गर्दीचा फायदा घेत ारट्यांनी ६० महिला आणि एक रुष यांचे सुमारे ९९० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरले होते. याप्रकरणी मिरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेनेदेखील सुरू केला होता.

उपायुक्त अविनाश अंबुरे, पोलिस निरीक्षक विजयकुमार बागल, अविराज कुराडे याच्या पथकाला मिळालेली माहिती, घटनास्थळासह मोबाईल फुटेज, मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील सीसी टीव्ही चित्रीकरण तपासले होते. या तपासात गुन्हे करणारे आरोपी हे राजस्थानमधील असल्याचे पोलिसांना समजले. पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनी चार विशेष पथके तयार केली. या पथकांनी राजस्थानमधील भरतपूर आणि अल्वर जिल्ह्यातील धोकादायक परिसरात तीस दिवस तळ ठोकला होता. स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने संशयित आरोपींना अटक केली.



**भाईंदर :** मार्चमध्ये मिरा रोड येथील कार्यक्रमात महिलांचे दागिने चोरीला गेले होते. दोन महिन्यांच्या तपासानंतर हे दागिने जप्त करत महिलांना सुपूर्द करण्यात आले.

### चोरीनंतर म्होरक्या गावी रवाना

संशयित आरोपी हे राजस्थानातील भरतपूर व अल्वर जिल्ह्यातील असल्याचे पोलिसांना समजले. कार्यक्रमाला होणाऱ्या गर्दीचा फायदा घेऊन ते दागिन्यांची चोरी करतात आणि हा ऐवज त्यांच्या म्होरक्याकडे देतात. नंतर म्होरक्या गावी निघून जातो, तर इतर चोरी करणारे हे पुन्हा कार्यक्रमाच्या ठिकाणी चोरी करतात.

### आठ जणांवर कारवाई

गीतादेवी सरदार सिंग, सेटू करमबीर सिंग, अर्जुन सिंग बीरेंद्र बावरिया, हेमा ऊर्फ हिरोदेवी सूरज, पिंकी सूर्यप्रताप सिंग ऊर्फ राहुल, रेश्मा हिराराम बावरिया ऊर्फ संत्रा बिरेंदर बावरिया, सोनिया अनिल कुम्हार, रंजितकुमार ऊर्फ प्रवीणकुमार जगदीश प्रसाद बावरिया अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून ७८७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले



CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्षः 26 अंक-330 मुंबई, सोमवार 15 मई 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# 15 लाख से अधिक का माल सहित 3 अपराधी धर दबोचे गए

**वसई :** ज्वैलर्स की दुकान के शटर तोड़कर चोरी व कार व ट्रक चुराने वाले आरोपी को गिरफ्तार किया गया,आरोपी के पास वाहन समेत कुलमिलाकर 15,50,000 रुपये का माल जप्त किया है तथा 12 अपराधों की गुत्थी सुलझाई गयी है। यह कार्रवाई मीरा-भाईंदर पुलिस आयुक्तालय क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 3 विरार युनिट के पी.आई प्रमोद बड़ाख,पीएसआई शिवाजी खाड़े व उमेश भागवत की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने रविवार को दी है। पुलिस अधिकारी ने बताया कि 11 सितंबर 2022 रात्रि 9;30 से 12 सितंबर 2022 रात्रि 2;35 के दरम्यान कावेरी ज्वेलर्स,शॉप क्र.13, पॅराडाईज सोसायटी, नालासोपारा पश्चिम स्थित बंद पड़ा ज्वैलर्स की दुकान पर लोहे की ग्रिल का ताला व लोहे के बंद शटर के ताले को किसी चीज से तोड़कर सेंटर का ताला तोड़ने का प्रयास करने पर भी सेंटर का ताला नहीं टूटा,ज्वैलर्स की दुकान के बाहर सी.सी.टी.वी कैमरा चोरी करके,ज्वैलर्स की दुकान में चोरी का प्रयास,इसलिए शिकायतकर्ता गोविंदसिंह कैलासिंह पुरोहित की शिकायत पर पश्चिम नालासोपारा थाने ने उपरोक्त मामले आरोपी पर कलम 457, 380, 379, 427, 511 के तहत केस दर्ज किया गया था।




उक्त अपराध की जांच क्राइम ब्रांच -3 को सौंपी गयी. तद्नुसार,क्राइम ब्रांच 3 के अधिकारियों एवं कर्मचारियों दिपकसिंह उर्फ भुशीसिंह राजुसिंह टाक (39) को हिरासत में लिया। गिरफ्तार आरोपी की आगे की जांच पर,10,00,000 रुपये मूल्य की 2 इको कार और 1 शेवरलेट एंन्जॉय कार जब्त की गई।पुलिस ने बताया कि साथ ही चोरी व चौपहिया वाहन चोरी के 10 अपराधों का खुलासा हुआ है।पुलिस ने बताया कि पकड़ा गया आरोपी शातिर अपराधी है व उसके खिलाफ म.को.का.,हत्या,डकैती, सेंधमारी,खासकर ज्वेलर्स की दुकान में चोरी, चौपहिया मोटर वाहन की चोरी जैसे 10 से अधिक अपराध गुजरात,नवी मुंबई,ठाणे शहर,मीरा भायंदर वसई विरार पुलिस कमिश्नरेट के तहत विभिन्न पुलिस थानों में दर्ज हैं।इसी तरह से 8 मई को शिकायतकर्ता लक्ष्मण चौहान की एमएच 48/जे 2281 गुडस कॅरीयर टाटा मोटर्स कंपनी की 5,00,000 रुपये की कीमत ट्रक चोरी में आरोपी (1).फहीम अब्बास भुरे और (2).दिनेश अनांता भोईर को गिरफ्तार कर लिया गया है। ट्रक और अपराध में प्रयुक्त मोटरसाइकिल के साथ जब्त किया गया तथा 2 अपराधों का खुलासा हुआ है।

CS CamScanner